# ‘टीसीएस आयटी विझ’मध्ये सेंटर पॉइंट स्कूल विजेते

**नागपूर :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)च्या वतीने आयोजित आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धा ‘टीसीएस आयटी विझ’च्या नागपूर येथील प्रादेशिक फेरीचे विजेतेपद वर्धमाननगरातील सेंटर पॉईंट स्कूलच्या अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी जिंकले. तर, रायपूरच्या कृष्णा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी गौरजा ऐरोन व यशराज मिश्रा यांनी उपविजेतेपद पटकाविले. १२ सप्टेंबर रोजी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात पार पडलेल्या या प्रादेशिक फेरीत नागपूर, भिलाई, रायपूर आणि दुर्गच्या विविध शाळातील ९००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वर्ग ८वी ते १२वीचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेची संकल्पना ‘ऑटोमेशन, संदर्भ ज्ञान, मशीन शिक्षण आणि चपळत’ ही होती. या वेळी व्हीएनआयटीचे संचालक डॉ. नरेंद्र चौधरी व टीसीएसचे नागपूर केंद्रप्रमुख अरविंद कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. संचालन गिरी पिकब्रेन बालसुब्रमण्यम यांनी केले.